उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) पदावर
तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याबाबत.
सन २०१८-१९ निवडसूची.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग,**
**शासन आदेश क्रमांक :एसएलएस-२०१८/प्र.क्र.२३६/१८/आ.(वर्ग-२)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०२०**

**शासन आदेश :-**

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय आस्थापनेवरील पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांचे अधिनस्त खालील वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक (गट-क) यांना उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) या पदावर पे. बँड S-१६ रुपये ४४९००-१४२४०० या वेतनश्रेणी मध्ये विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८.०४.२०१५, दिनांक १६.०७.२०१५ व दिनांक १५.०६.२०१७ मधील तरतुदीनुसार महसूल संवर्ग वाटप करुन तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

२. संबंधितांची पदोन्नतीनंतर रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभियंत्यांचे नाव व पदनाम | पदोन्नतीने वाटप केलेला महसुली विभाग | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. सहदेव नवनाथ ढेकणे | नाशिक | अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे अतंर्गत नाशिक महसुली संवर्गातील रिक्त पदी |
| २. | श्री. भास्कर नारायण गायकवाड | पुणे | अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे अतंर्गत पुणे महसुली संवर्गातील रिक्त पदी |
| ३. | श्री. किरण लक्ष्मण सपकाळ | अमरावती | अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे अतंर्गत अमरावती महसुली संवर्गातील रिक्त पदी |

३. उक्त वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक (गट-क) यांना उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) पदावर पदोन्नतीने सविस्तर पदस्थापना देण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांना देण्यात येत आहेत. त्यांनी पदोन्नत अधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे वाटप करण्यात आलेल्या महसूली विभागात उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) संवर्गातील रिक्त पदावर सविस्तर पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावे. तसेच संबंधितांना पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करुन अहवाल शासनास सादर करावा.

**अटी व शर्ती**

i) उपरोक्त वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक यांनी पदोन्नतीनंतर नियुक्तीच्या ठिकाणी एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. जर संबंधित अधिकारी पदोन्नतीच्या ठिकाणी विहित मुदतीत हजर झाले नाहीत, तर ते पदोन्नतीस इच्छुक नाहीत असे गृहीत धरुन त्यांना दिलेली पदोन्नती रद्द करण्यात येईल.

ii) उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) पदावरील संबंधितांची पदोन्नती जरी तात्पुरत्या स्वरुपातील असली तरी, कालांतराने ती नियमित होत असल्याने जे वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदोन्नती नाकारतील त्यांचेबाबतीत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हे पदोन्नतीच्या पदावर विहित मुदतीत हजर न झाल्यास त्यांचे माहे एप्रिल, २०२० पासूनचे वेतन काढण्यात येऊ नये. याबाबतची सर्व जबाबदारी अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांची राहिल.

iii) संबंधितांच्या पदोन्नत्या त्यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नसल्याच्या अटीच्या अधीन राहून पदोन्नती करण्यात येत आहे. तथापि, त्यांचेविरुध्द या आदेशाच्या दिनांकास अथवा भविष्यात विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित असल्याचे आढळून आल्यास त्यांच्या बाबतीत सदर आदेश आपोआप रद्द होतील.

iv) सदर तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

v) सदर पदोन्नती संबंधितांच्या वयाच्या ५०-५५ व्या वर्षी करण्यात येणाऱ्या सेवा पुनर्विलोकनाच्या अधीन राहिल.

vi) सदर पदोन्नती ही तात्पुरती असून, त्यांना पदोन्नतीमुळे नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

vii) उपमृद सर्वेक्षण अधिकारी पदावर पदोन्नती झालेल्या वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक यांनी दिनांक ३१.०३.२०१९ अखेरचे मत्ता व दायित्व विवरण संबंधित कार्यालयास सादर केले असल्याची खात्री अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांनी करावी.

हे आदेश जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांची प्रत संबंधीतांनी उपलब्ध करुन घेवून पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अरविंद वि. पगार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
४) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (१२ व १६ ब), मंत्रालय, मुंबई,
५) उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे.
७) संबंधित वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक यांना अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे या कार्यालयामार्फत रवाना.
८) महालेखापाल (लेखा परीक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१०) कार्यासन अधिकारी, गोपनीय कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) आ. (वर्ग-२) कार्यासन, संग्रहार्थ.